# ५

# पवित्र आत्मा कोण आहे?

"पवित्र आत्मा *काय* आहे?" असा प्रश्न नाही, तर "पवित्र आत्मा *कोण* आहे?" असा प्रश्न आहे. हा प्रश्न यासाठी आहे की, पवित्र आत्मा एक व्यक्ती आहे, त्याला व्यक्तित्त्व आहे. तो देवत्वातील तिसरी व्यक्ती आहे. तो केवळ शक्ती किंवा सामर्थ्य नाही, तर जिवंत स्वर्गीय व्यक्ती आहे.

## तो एखाद्या व्यक्तीसारखा आहे

पवित्र शास्त्रात उपलब्ध असलेली सर्व माहिती, पवित्र आत्मा एक ईश्वरीय व्यक्ती आहे याकडे निर्देश करते. पिता व पुत्राप्रमाणे त्याच्यामध्येसुद्धा वैयक्तिक स्वभावगुण आहेत.

### त्याच्या ठायी व्यक्तीची गुणवैशिष्ट्ये आहेत

पवित्र आत्माच्या गुणवैशिष्ट्यांवरून हे माहीत होते की, तो एक केवळ बल नव्हे तर जिवंत व्यक्ती आहे, त्याचे स्वतःचे व्यक्तिमत्त्व आहे.

१. *तो निर्णय देतो* : "पवित्र आत्म्याला ... आम्हांला योग्य दिसले" (प्रे. कृ. १५:२८).

२. *त्याला मन आहे* : "पण अंतर्यामे पारखणाऱ्याला त्या आत्म्याचा मनोभाव काय हे ठाऊक आहे, कारण हा आत्मा पवित्रजनांसाठी देवाच्या मर्जीप्रमाणे मध्यस्थी करतो" (रोम.८:२७).

३. *त्याला इच्छाशक्ती आहे* : "तरी ही सर्व कार्ये तोच एक आत्मा करतो, तो आपल्या इच्छेप्रमाणे एकेकाला ती वाटून देतो" (१ करिंथ.१२:११).

४. *तो ज्ञानी आहे* : "तशा देवाच्या गोष्टी, देवाच्या आत्म्याशिवाय कोणीही ओळखत नाही" (१ करिंथ.२:११).

५. *त्याला भावना आहेत* (प्रेम, दुख, आनंद): ''बंधुजनहो, आपल्या प्रभुयेशूख्रिस्तामुळे व आत्म्याच्या प्रेरणेमुळे तुम्हास विनंती करतो की, मजसाठी देवाजवळ प्रार्थना करण्यास मजबरोबर खटपट करा'' (रोम.१५:३०); ''देवाच्या पवित्र आत्म्याला खिन्न करू नका, त्याच्याद्वारे तुम्ही तारणाच्या दिवसापर्यंत मुद्रित झाला आहा'' (इफिस.४:३०); ''तुम्ही फार संकटात असताना पवित्र आत्म्याच्या द्वारे मिळालेल्या आनंदाने वचन स्वीकारून आमचे व प्रभुचे अनुकारी झाला'' (१ थेस्सल.१:६).

पवित्र आत्म्यामध्ये ही गुणवैशिष्ट्ये आहेत, यावरून ती एक व्यक्ती आहे हे प्रकट होते.

**तो एका व्यक्तीसारखेच काय करतो**

पवित्र आत्मा केवळ बल नाही तर एका व्यक्तीप्रमाणे कार्य करतो. तो खालील प्रकारचे कार्य करतो :

१. *तो शिक्षण देतो व आठवण करून देतो* : ''तरी ज्याला पिता माझ्या नावाने पाठवील तो कैवारी म्हणजे पवित्र आत्मा तुम्हांस सर्व शिकवील आणि ज्या गोष्टी मी तुम्हांस सांगितल्या त्या सर्वांची तुम्हांस आठवण देईल'' (योहान.१४:२६).

२. *तो साक्ष देतो* : ''परंतु जो पित्यापासून निघतो, ज्याला मी पित्यापासून तुम्हांकडे पाठवीन असा कैवारी म्हणजे सत्याचा आत्मा येईल तेव्हा तो मजविषयी साक्ष देईल'' (योहान.१५:२६).

३. *तो सत्याचा मार्ग दाखवतो* : ''तरी तो सत्याचा आत्मा येईल तेव्हा तो तुम्हांस मार्ग दाखवून सर्व सत्यांत नेईल'' (योहान.१६:१३).

४. *तो बोलतो* : ''कारण तो आपल्या स्वतःचे सांगणार नाही'' (योहान.१६:१३; प्रे. कृ.८:२९; ११:१२; १ तिमथ्य.४:१ पाहा).

५. *तो ऐकतो* : ...''तर जे काही ऐकेल तेच सांगेल'' (योहान.१६:१३).

६. *तो अद्‌भुत गोष्टी प्रकट करतो* : ''...आणि होणाऱ्या गोष्टी तुम्हांस विदित करील'' (योहान.१६:१३).

७. *तो मनाई करतो* : ''नंतर आसिया देशांत वचन सांगण्यात त्यांस पवित्र आत्म्याकडून अडथळा झाल्यामुळे ते फ्रुगिया व गलतिया या प्रांतामधून गेले'' (प्रे. कृ.१६:६).

८. *तो जीवन देतो* : ''ज्याने ख्रिस्त येशूला मेलेल्यांतून उठवले तो तुमच्यामध्ये वसती करणाऱ्या आपल्या आत्म्याने तुमची मर्त्य शरीरेही जिवंत करील'' (रोम.८:११).

९. *तो प्रकट करतो* : ''परंतु देवाने ते स्वतःच्या आत्म्याच्या द्वारे आपल्याला प्रकट केले'' (१ करिंथ.२:१०; इफिस.३:३-५ बघा).

१०. *तो शोधतो* : ''कारण आत्मा हा सर्व गोष्टींचा व देवांच्या रहस्याचाही शोधक आहे'' (१ करिंथ.२:१०).

११. *तो वचन देतो* : ''ह्यात उद्देश हा की अब्राहायाला दिलेल्या आशीर्वाद ख्रिस्त येशूमध्ये विदेशी लोकांना मिळावा, म्हणजे आपणाला विश्वासाच्याद्वारे आत्म्याचे वचन मिळावे'' (गलती.३:१४; आणि प्रे. कृ.२:३३ बघा).

१२. *तो सहभागितो करतो* : ''प्रभु येशू ख्रिस्ताची कृपा, देवाची प्रीती आणि पवित्र आत्म्याची सहभागिता तुम्हां सर्वासह असो'' (२ करिंथ.१३:१४; फिलिप्पै. २:१ पाहा).

१३. *तो विनंती करतो* : ''पण आत्मा स्वतःच अनिर्वाच्य उच्छ्वासांनी आपल्यासाठी विनंती करतो कारण हा आत्मा पवित्र जनांसाठी देवाच्या मर्जीप्रमाणे विनंती करतो'' (रोम.८:२६,२७).

१४. *तो भविष्यसंदेश (पुढे होणाऱ्या गोष्टी) सांगतो* : ''त्याच्यामध्ये जो ख्रिस्ताचा आत्मा होता त्याने ख्रिस्ताची दुःखे व त्यानंतरच्या गौरवयुक्त गोष्टीही पूर्वीच सांगितली'' (१ पेत्र.१:११).

१५. *तो आमंत्रण देतो* : ''आत्मा व वधू ही म्हणतात, 'ये''' (प्रकटी.२२:१७).

१६. *तो मार्गदर्शन करतो* : ''येशू पवित्र आत्म्याने परिपूर्ण असा यार्देनेपासून माघारा आला, आणि त्याला आत्म्याने चाळीस दिवस रानांत नेले'' (लूक.४:१). जितक्यांस देवाचा आत्मा चालवितो ते देवपुत्र आहेत (रोम.८:१४).

एक व्यक्ती ही सर्व कामे करू शकते. पण केवळ एखादी शक्ती हे करू शकत नाही. म्हणून पवित्र आत्मा एक व्यक्ती आहे या दृष्टिकोनातून त्याच्याकडे पाहिले पाहिजे.

### त्याच्यासोबत दुर्व्यवहार होऊ शकतो

पवित्र आत्म्याचा अनादर करण्यासाठी व त्याला खिन्न करण्यासाठी जे शब्द वापरले जातात, ते एखाद्या अमूर्त शक्तीविरुद्ध वापरले जात नाहीत, तर व्यक्तीविरुद्ध

वापरले जाणारे असतात. त्यासोबत खालीलप्रमाणे दुर्व्ययवहार होऊ शकतो.

१. *त्याची निंदा होऊ शकते* : ''...परंतु पवित्र आत्म्याविरुद्ध जे दुर्भाषण आहे त्याची क्षमा होणार नाही ...परंतु जो कोणी पवित्र आत्म्याविरुद्ध बोलेल त्याची त्याला क्षमा होणार नाही; ह्या युगात नाही व येणाऱ्या युगातही नाही'' (मत्तय.१२ः३१,३२).

२. *त्याच्याशी लबाडी केली जाऊ शकते* : ''तेव्हा पेत्र म्हणाला, हनन्या तू पवित्र आम्याशी लबाडी करावी ...म्हणून सैतानाने तुझे मन का भरवले आहे?'' (प्रे. कृ.५:३).

३. *त्याला अडविले जाऊ शकते* : ''अहो ताठ मानेच्या आणि हृदयाने व कानांनी बेसुंती लोकांनो, तुम्ही पवित्र आत्म्याला सर्वदा अडविता'' (प्रे. कृ.७ः५१).

४. *त्याला दुःखित केले जाऊ शकते* : ''देवाच्या पवित्र आत्म्याला खिन्न करू नका, त्याच्यायोगे तुम्ही तारणाच्या दिवसापर्यंत मुद्रित झाला आहा'' (इफिस.४ः३०).

५. *त्याचा अपमान व तिरस्कार होऊ शकतो* : ''आणि कृपेच्या आत्म्याचा अपमान केला'' (इब्री.१०ः२९).

६. *त्याला विझवता येऊ शकते* : ''आत्म्याला विझवू नका'' (१ थेस्सल.५ः१९).

पवित्र आत्म्याविरुद्ध कसा दुर्व्यवहार होऊ शकतो हे सांगणारी ही काही विधाने पवित्र आत्मा व्यक्ती आहे हे दर्शवतात. एखाद्या शक्ती किंवा सामर्थ्याच्या अनादराचे वरील प्रकारे वर्णन केवळ कवितांमध्ये किंवा अलंकारिक पद्धतीनेच केले जाते. पण या ठिकाणी जे संदर्भ दिले आहेत, त्यांमध्ये अलंकारिक भाषा वापरली गेली नाही.

**त्याचे स्वतःचे अस्तित्व आहे**

पवित्र आत्मा एक व्यक्ती आहे याचे अजून एक दर्शक म्हणजे पिता व पुत्रासोबत त्याचा उल्लेख केला आहे, त्यांचे गुणविशेष एकच आहेत एवढेच सांगितले आहे असे नाही, तर त्याचे स्वतःचे वेगळे अस्तित्व आहे.

येशूचा बाप्तिस्मा झाल्यावर पवित्र आत्मा त्याच्यावर उतरला असा उल्लेख आहे (योहान.१ः३३). बाप्तिस्मा झाल्यानंतर पुत्र पाण्यातून बाहेर आला तेव्हा पवित्र आत्मा त्याच्यावर उतरला आणि पिता आकाशातून बोलला (मत्तय.३ः१६,१७; लूक. ३ः२१,२२). पिता स्वर्गात होता, पुत्र पृथ्वीवर होता आणि पवित्र आत्मा येशूसोबत राहण्यासाठी आला.

येशू विरूध्द कोणी काही बोलेल तर त्याची त्याला क्षमा होईल, परंतु जो कोणी पवित्र आत्म्याच्या विरुद्ध बोलेल. त्याची त्याला क्षमा होणार नाही (मत्तच.१२ः३२).

जर या दोन्ही व्यक्ती एकच असत्या तर एखादी व्यक्ती येशूच्या विरोधी बोलेल आणि पवित्र आत्म्याच्या विरुद्ध बोलणार नाही असे होऊ शकले का? ही शिकवण देत असताना येशूने निश्चितच दोघांचीही ओळख वेगळी ठेवण्याचे ध्यानात ठेवले असेल.

इतर लोक जसे पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाले (प्रे. कृ.६:३,५; ७:५५; ११:२४). तसा येशू पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाला असे लूक ४:१ मध्ये म्हटले आहे. पवित्र आत्म्याने परिपूर्ण झालेले प्रेषितांची कृत्येमधील हे लोक स्वतः पवित्र आत्मा नव्हते याच्यासी आपण निश्चितच सहमत असू. तसेच येशू आणि पवित्र आत्मा हे दोघे वेगळ्या व्यक्ती आहेत हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

योहान लिहितो की, अजून येशूचे गौरव झाले नव्हते, म्हणून अद्याप पवित्र आत्मा तोपर्यंत दिला नव्हता (योहान.७:३९). येशू ख्रिस्त पृथ्वीवर आपल्या शिष्यांसह होता तेव्हा हे लिहिले आहे. पवित्र आत्मा जर अजून दिला नव्हता, तर याचा अर्थ तो येशूपेक्षा निराळी व्यक्ती आहे.

''मी तुमच्यासाठी कैवारी पाठवीन'' असे येशूने योहान १४:२६ मध्ये शिष्यांना म्हटले. योहान.१४:१६ नुसार हा मदतनीस म्हणजे पवित्र आत्मा होय. जर येशू स्वतःच कैवारी असता, तर तो दुसरा कैवारी कसा पाठवू शकला असता? आणि पवित्र आत्मा व येशू एकच व्यक्ती असते, तर पवित्र आत्मा हा ''दुसरा'' कैवारी कसा असता?

येशूने म्हटले, मी न गेलो तर कैवारी तुम्हाकडे येणार नाही, मी गेलो तर त्याला तुम्हांकडे पाठवीन (योहान.१६:७). त्याने हेसुद्धा म्हटले होते, पवित्र आत्मा स्वतःच्या मनचे काही बोलणार नाही, तर येशू जे सांगेल तेच बोलेल (योहान.१६:१३). नवीन करारात येशू आणि पवित्र आत्म्याविषयी दिलेल्या सर्व माहितीवरून ते दोन स्वतंत्र वेगळ्या स्वर्गीय व्यक्ती आहेत हे लक्षात येते.

## तो ईश्वरीय आहे

पवित्र आत्म्याचा उल्लेख पिता व पुत्राबरोबर केला आहे. तो त्यांच्या समान, त्यांच्याच दर्जाचा आहे. लोकांना पिता, पुत्र व पवित्र आत्मा यांच्या नावात बाप्तिस्मा दिला जातो (मत्तय.२८:१९). २ करिंथ.१३:१४ मध्ये ''प्रभू येशू ख्रिस्ताची कृपा, देवाची प्रीती आणि पवित्र आत्म्याची सहभागिता तुम्हा सर्वांसह असो,'' असे म्हणून त्या तिघांचाही दर्जा एकसारखा आहे असे सांगितले आहे. पवित्र आत्मा, देव (''पिता'' - १ करिंथ.८:६) आणि प्रभू (''येशू'' - १ करिंथ.८:६) हे तिघे आत्मिक दाने देतात (१ करिंथ.१२:४-६). ही दाने पवित्र आत्म्याच्या इच्छेने दिली

जातात असे म्हटले आहे (१ करिंथ.१२:११).[१]

नवीन करारातील पुरावा हे जोरदारपणे स्पष्ट करतो की, पिता, पुत्र व पवित्र आत्मा या एकाच स्वभावगुणाच्या तीन निराळ्या स्वर्गीय व्यक्ती आहेत. मानवाच्या सेवेच्या दृष्टीकोनातून आणि एकमेकांशी असलेल्या संबंधामुळे ते एक आहेत.

केवळ देवाची म्हणून जी गुणवैशिष्ट्ये आहेत ती पवित्र आत्म्याचीसुद्धा आहेत. पिता व पुत्राप्रमाणे जी पाच गुणवैशिष्ट्ये त्याच्याकडे आहेत ती लक्षात घ्या.

१. *तो अनंकाळाचा आहे* : पवित्र शास्त्रातील खालील वाक्ये त्याच्या सार्वजनिक स्वभावाबद्दल सांगतात (१) पवित्र आत्मा – ''...सार्वकालिक आत्म्याच्या योगे ज्याने निष्कलंक अशा स्वतःस देवाला अर्पण केले त्या ख्रिस्ताचे रक्त आपली सद्सद्विवेकबुद्धी जिवंत देवाच्या सेवेसाठी निर्जीव कृत्यांपासून किती विशेषेकरून शुद्ध करील?'' (इब्री.९:१४); (२) पिता – ''तुझे सिंहासन, अनादिकालापासून स्थिर

---

[१]चमत्काराचे दान आता राहिले नाही. याविषयी आपण १ करिंथ १३:८–१३ च्या स्पष्ट कथनाने आश्वस्त होवू शकतो. १ करिंथ याच्या तीन अध्यायामध्ये (१२–१४) पौलाची चर्चा आढळते. या चर्चेच्या मध्यंतरी, त्याने घोषणा केली की प्रेम कोणत्याही चमत्काराच्या दानापेक्षा श्रेष्ठ आहे (१३:१–३). त्यानंतर त्याने प्रेमाचे वर्णन केले (१३:४–७). अध्यायाच्या शेवटच्या भागामध्ये (१३:८–१३), त्याने दाखविले की प्रीती जी की एक सर्वश्रेष्ठ दान आहे, ती आध्यात्मीक दानाच्या नंतरही राहणार होती. पौल म्हणत होता, ''संदेश असले तरी ते रद्द होतील. भाषा असल्यातरी त्या समाप्त होतील (चमत्कारी) विद्या असली तरी ती रद्द होईल.'' या दानांच्या कारणाने पौलाला म्हणावे लागले होते की, ''आपल्याला केवळ अंशतः कळते, आणि अंशतः संदेश देता येतो, पण पूर्णत्वाचे आगमन झाल्यावर अपूर्णता नष्ट होईल'' (वचन ९,१०). ''पूर्णत्व'' चे आगमन झाल्यावर हे चमत्काराचे दान समाप्त होणार होते.

कारण की ''पूर्णत्व'' चा अर्थ संपूर्ण आहे, यासाठी ह्याची तुलना त्याच्याबरोबर होवू शकते जे ''अपूर्ण'' आहे. ''अपूर्णता'' ते चमत्कारी विद्या आणि संदेश आहे, ज्याच्याद्वारे मौखिक रितीने परमेश्वराचे वचन प्रगट झाले. मग तर, हे समजते सहज स्वाभाविक आहे की, संपूर्ण किंवा ''पूर्णत्व'' पपरमेश्वराचे ते प्रकाशन आहे. जे नवीन करारात लिहून मनुष्यासाठी दिल्या गेले आहे. परमेश्वराच्या इच्छेचे हे संपूर्ण प्रकाशन, ''विश्वास'' जो पवित्रजनांना एकदाच स्वाधीन केल्या गेला'' (यहूदा.३), पहिल्या शतकाच्या आतापर्यंत मिळाले. जेव्हा ''पूर्णत्व'' आले तेव्हा ''अपूर्णत्व'' नष्ट झाले कारण की नवीन करारात परमेश्वराची संपूर्ण इच्छा नमुद आहे (२ तिमथ्थी.३:१६,१७; २ पेत्र.१:३). यासाठी आणखी अधिक प्रकाशनासाठी चमत्काराच्या दानाची गरज नाही. (फिल सॅन्डर्स, ''डज ऐनीवन हॅव मिरॅकूल्स गिफ्टस् टूडे?'' कोणाहीकडे आज चमत्काराचे दान आहे का?) ट्रुथ फॉर टुडे चे इंग्रजी संस्करण (एप्रील १९९५):४९.

आहे तू सनातन आहेस'' (स्तोत्र.९३:२); आणि (३) येशू - ''येशू ख्रिस्त काल, आज व युगानुयुग सारखाच आहे'' (इब्री.१३:८); ''आणि अशा प्रकारे आपला प्रभू व तारणारा येशू ख्रिस्त याच्या सार्वकालिक राज्यात जयोत्सवाने तुमचा प्रवेश होईल'' (२ पेत्र.१:११).

२. *तो सर्वज्ञानी आहे* : पवित्र आत्म्याच्या संदर्भातील या ज्ञानाविषयी पवित्र शास्त्रातील पुढील वचने सांगतात (१) पवित्र आत्मा - ''परंतु देवाने ते स्वतःच्या आत्म्याच्या द्वारे आपल्याला प्रकट केले, कारण आत्मा हा सर्व गोष्टींचा व देवाच्या रहस्यांचाही शोधक आहे'' (१ करिंथ.२:१०); (२) पिता - ''आणि त्याच्या दृष्टीला सर्व उघडेवाघडे आहे'' (इब्री.४:१३); आणि (३) येशू - ''येशूला तर सर्वांची ओळख असल्यामुळे त्याने स्वतःला त्यांच्या हाती सोपविले नाही, आणखी मनुष्याविषयी कोणी साक्ष द्यावी याची त्याला गरज नव्हती, कारण मनुष्यांत काय आहे याचे ज्ञान त्याला स्वतःला होते'' (योहान.२:२४,२५).

३. *तो सर्व समर्थ आहे* : पवित्र आत्म्याच्या सर्वशक्तिशालीपणाविषयी पवित्र शास्त्रातील पुढील वचने बोलतात - (१) पवित्र आत्मा - ''पवित्र आत्मा तुजवर येईल आणि परात्पराची शक्ती तुजवर छाया करील'' (लूक.१:३५); ''नंतर येशू आत्म्याच्या सामर्थ्याने गालिलात माघारा आला'', (लूक.४:१४); ''पवित्र आत्मा तुम्हावर येईल तेव्हा तुम्हास सामर्थ्य प्राप्त होईल'' (प्रे. कृ.१:८); (२) देव - ''कारण देवाला काहीच अशक्य होणार नाही'' (लूक.१:३७); आणि (३) येशू - ''...स्वर्गात आणि पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिलेला आहे'' (मत्तय.२८:१८).

४. तो सर्वोपस्थित आहे : एकाच वेळी सर्वत्र उपस्थित असण्याची ही क्षमता या तिघांकडेही आहे. (१) पवित्र आत्म - ''मी तुझ्या आत्म्यापासून कोठे जाऊ?'' (स्तोत्र.१३९:७); (२) पिता - ''देव या भूतलावर खरोखर वास करील काय? आकाश व नभोमंडल यांत तुझा समावेश होणे नाही'' (१ राजे.८:२७); ''परमेश्वर म्हणतो, माझ्या दृष्टीस पडणार नाही अशा गुप्त स्थळी कोणास लपता येईल काय? मी आकाश व पृथ्वी व्यापून राहत नाही काय?'' (यिर्मया २३:२४); आणि (३) येशू - ''युगाच्या समाप्तीपर्यंत मी सदोदित तुम्हांबरोबर आहे''. (मत्तय.२८:२०)

५. *त्याच्यामध्ये निर्माण करण्याची शक्ती आहे* : पवित्र शास्त्रातील पुढील वचने त्रैक्यातील प्रत्येक व्यक्तीला सृष्टीकर्त्याच्या रूपात प्रस्तुत करतात : (१) पवित्र आत्मा - ''आणि देवाचा आत्मा जलावर तळपत होता'' (उत्पत्ती १:२); (२) पिता - ''त्याने पृथ्वी आपल्या सामर्थ्याने उत्पन्न केली, त्याने आपल्या ज्ञानाने विश्व स्थापिले;

आपल्या बुद्धीने आकाश पसरविले'' (यिर्मया ५१:१५); आणि (३) पुत्र – ''कारण आकाशांत व पृथ्वीवर असलेले, दृश्य व अदृश्य असलेले, राजे, अधिपती, सत्ताधीश किंवा अधिकारी असलेले ते सर्व त्याच्यामध्ये उत्पन्न झाले, सर्व त्याच्याद्वारे व त्याच्यासाठी उत्पन्न झाले'' (कलस्सै.१:१६).

## सारांश

पित्यासाठी जे शब्दप्रयोग लागू होतात, तेच शब्दप्रयोग पवित्र आत्म्याचे वर्णन करण्यासाठी वापरले आहेत. यावरून आपण असा निष्कर्ष काढू शकतो की, पिता व पुत्रासारखीच पवित्रआत्म्याची गुणवैशिष्ट्ये आहेत, आणि पिता व पुत्रासोबत तो एक आहे, तरी पण वेगळी व्यक्ती आहे. पवित्र शास्त्रातील तो एक महत्त्वाची मध्यवर्ती व्यक्ती आहे.

## अभ्यासासाठी प्रश्न

*(उत्तरे पृष्ठ 232 वर आहेत)*

१. ''पवित्र आत्मा *काय* आहे?'' याऐवजी ''पवित्र आत्मा *कोण* आहे?'' असा प्रश्न का विचारला पाहिजे याचे स्पष्टीकरण करा.

२. पवित्र आत्मा ही जिवंत व्यक्ती आहे हे दर्शवणारी पाच गुणवैशिष्ट्ये कोणती आहेत?

३. पवित्र आत्म्यासोबत दुर्व्यवहार होऊ शकतो, या वस्तुस्थितीवरून ती एक व्यक्ती आहे हे कसे लक्षात येते?

४. पवित्र आत्म्याची कोणती गुणवैशिष्ट्ये पिता व पुत्रासारखी आहेत?

## शब्दार्थ

**गुणवैशिष्ट्ये** – रोम.१:२० मध्ये म्हटले आहे, ''त्याचे अदृश्य गुण म्हणजे त्यांचे सनातन सामर्थ्य व देवत्व ही निर्मिलेल्या पदार्थावरून ज्ञात होऊन सृष्टीच्या उत्पत्तीकालापासून स्पष्ट दिसत आहेत, यासाठी की त्यांनी निरुत्तर व्हावे.''

**अलौकिक (चमत्काराची) दाने** – नवीन करार लिहून पूर्ण होण्याच्या आधी परमेश्वराकडून मंडळीला मिळालेल्या विशेष क्षमता, उदा. अन्य भाषांत बोलणे, आरोग्य देणे, भविष्य संदेश सांगणे. या दानांची आता गरज नाही,

किंवा ती आता उपलब्ध नाहीत (पाहा इफिस.४:५; मत्तय.२८:१८-२०).

## आज ख्रिस्ती लोकांत पवित्र आत्म्याचे कार्य

१. तो आम्हांला पाप व मरण यांच्या नियमापासून मुक्त करतो (रोम.८:२-८).
२. तो आमची मर्त्ये शरीरे जिवंत करीतो (रोम.८:११).
३. तो आमच्या प्रार्थनेत मदत करतो (रोम.८:२६; इफिस.६:१८).
४. तो आमच्यासाठी विनंती करतो (रोम.८:२६,२७).
५. तो आम्हांला आत्म्याच्या प्रेरणेने चालवतो (रोम.८:१४).
६. उद्धाराच्या दिवसासाठी तो आमच्यावर शिक्का मारून आम्हांला मुद्रित करतो (२ करिंथ.१:२२; इफिस.१:१३,१४; ४:३०).
७. त्याची उपस्थिती आमच्यासोबत आहे (२ करिंय. १३:१४).
८. त्याची आमच्यासोबत सहभागिता आहे (इफिस.२:१८).
९. तो अंतर्यामे बलसंपन्न करतो (इफिस.३:१६).
१०. तो ऐक्य राखण्यासाठी झटतो (इफिस.४:३).
११. तो आम्हांला पवित्र करतो (२ थेस्सल.२:१३).